**महाराष्ट्र शासन**

**समाज कल्याण आयुक्तालय,3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-411 001**

दूरध्वनी क्र .20-26122752 फॅक्सक्र.020-26126698 ईमेल sakalyanpuneest@gmail.com

**रजिस्टर पोस्टाने**

सहाय्यक शिक्षक (ठोक वेतन) **कागदपत्र पडताळणी**

दिनांक .21.03.2017

क्र.सकआ/आस्था-5- (अ) /ससेभप्र/शिक्षक 2016-17/का-6/529

दिनांक-04/03/2017

**प्रति,**

**(तात्पूरत्या निवड यादीमध्ये नावे असणारे सर्व उमेदवार)**

**विषय : "सहाय्यक शिक्षक इयत्ता 9 वी व 10 वी (ठोक वेतन)" या पदासाठी प्राथमिक (Provisional) निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्रे तपासणीबाबत.**

**संदर्भ : दिनांक 01.03.2017 रोजीची तात्पूरती गुणवत्ता निवड यादी .**

वरील विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भात नमूद केल्याप्रमाणे सहाय्यक शिक्षक (ठोक वेतन) इयत्ता 9 वी व 10 वी या पदाची तात्पूरती गुणवत्ता निवड यादी प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर तात्पूरती गुणवत्ता निवड यादीमध्ये आपल्या नावाचा समावेश आहे. सहाय्यक शिक्षक (ठोक वेतन) पदाच्या नियुक्तीसाठी आपले नाव विचाराधीन असून त्यासाठी खालील **मूळ** कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक आहे.

1. शैक्षणिक पात्रतेची सर्व कागदपत्रे (TET गुणपत्रकासह)
2. जातीचा दाखला आवश्यक आहे जात वैधता प्रमाणपत्र असल्यास सादर करावे सदर पदी निवड झाल्यास नियुक्ती झाल्यापासून 6 महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
3. नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (महिलांसाठी राखीव असलेल्या पदांसाठी तसेच विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग इत्यादीसाठी राखीव असलेल्या पदांसाठी 2 प्रतीत)
4. अपंगत्वाचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ( किमान 40%) (अपंग उमेदवारांसाठी 2 प्रतीत)
5. खेळाचे प्रमाणपत्र (खेळाडूंसाठी 2 प्रतीत)
6. माजी सैनिक असल्याबाबतचे /युध्द काळात किंवा युध्द नसतांना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाचे फक्त एक पाल्य असल्याबाबतची आवश्यक कागदपत्र. (2 प्रतीत)
7. अंशकालीन /प्रकल्पग्रस्त /धरणग्रस्त /भुकंपग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र.(2 प्रतीत)
8. इतर आवश्यक कागदपत्रे (ऑनलाईन अर्जाची छायांकित प्रत, स्वताचे ओळखपत्र,पासपोर्ट साईज फोटो इ.) सादर करावेत .
9. सर्व मूळ कागदपत्रांची छायांकीत (सांक्षाकीत केलेली) 1 प्रत स्वतंत्र सादर करावी.
10. सदर कागदपत्र पडताळणीसाठी अनुपस्थित राहील्यास मुदतवाढ दिली जाणार नाही व पुन्हा कागदपत्र पडताळणीसाठी बोलविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उमेदवारांनी वरील मुळ कागदपत्रे तपासणीसाठी सोबत आणावी तसेच सर्व कागदपत्राच्या स्वस्वाक्षरीत (Self Attested ) प्रतीसह, दिनांक 21.03.2017 रोजी सकाळी 10.00 वाजता समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ, जी.पी.ओ. जवळ, पुणे 1 येथे कागदपत्र पडताळणीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे.**

उपायुक्त (प्रशासन),
समाज कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य पुणे.